

# ३. शेतकऱ्यांची परिस्थिती

–जोतीराव गोविंदराव फुले

**विषयप्रवेश -**

- प्रस्तावना
- शब्दार्थ
- स्वाध्याय

## प्रस्तावना –

महात्मा जोतीबा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातून हा पाठ घेतलेला असून, या पाठामध्ये महात्मा फुले शेतकऱ्यांची बाजू घेऊन इंग्रजांच्या अन्यायी धोरणाबद्दल त्यांना जाब विचारत आहेत. इंग्रज सरकारने आपल्या कामगारांना सर्व सुखसोयी प्राप्त करुन दिल्या परंतू शेतकऱ्यांकडे मात्र दुर्लक्ष केले. शेतकऱ्यांना दोन वेळचे अन्नही नीट मिळत नसतांना सरकारी कामगार मात्र ऐशारामात जीवन जगत आहे. या पाठातून महात्मा फुले यांच्या मनातील शेतकऱ्यांविषयीचा कळवळा, अन्यायाच्या विरोधातील चीड व्यक्त होते.

## शब्दार्थ –

१) एक अर्व – दहा कोटी
२) अजीबाद – आजीबात, पूर्णत:
३) मोहिम – योजना
४) अपेशाचे – अपेक्षांचे
५) कपाळचा – नशिबातील
६) खपावे – नष्ट करावे
७) नेटिव्ह – त्या देशातील रहिवासी
८) वारुन – दूर करुन
९) कुणबी – शेतकरी
१०) कुणबावा – शेतकऱ्याचे काम
११) बटवी – लहान बटवा
१२) झटे घेता घेता – झटता झटता
१३) आळपलेला – बांधलेला
१४) वरु – कणी
१५) मोडशी – हगवण, पोटदुखी
१६) पट्टी – कर
१७) बनात – एक लोकरीचे वस्त्र
१८) धाबळी – उबदार पांघरुण
१९) बेलगामी – अनियंत्रित
२०) निहारी – न्याहारी
२१) डहुरा – पाण्याने भरलेला डोह
२२) शेतखाना – शौचकुप, पायखाना
२३) तोस्तान – काडतुसे बंदुकीची दारु ठेवण्यासाठी कमरेला बांधलेली पिशवी.
२४) धसकट – ज्वारी किंवा बाजरी यांसारख्या पिकांची कापणी झाल्यानंतर जमिनीलगत राहिलेला पिकाच्या ताटाचा धारदार भाग
२५) धारी लागणे – स्थिर होणे
२६) नोकदार – टोकदार
२७) कर्डे करडू – शेळीचे पिलू
२८) कटार – कट्यार
२९) पाक – स्वयंपाक
३०) हंडी – झुंबर
३१) तैनातीत – ताब्यात, सेवेत
३२) डोलीसुद्धा – डोलीसहित
३३) ददात नसणे – उणीव नसणे, कमतरता नसणे
३४) गुलाबी लिहीणे – फसवे लिखाण

## टिपा –

१) असमानी व सुलतानी – अस्मानी म्हणजे नैसर्गिक संकट. उदा. पूर, भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी इत्यादी, सुलतानी म्हणजे राजाची दडपशाही.

२) मे. वेडरबर्नसाहेब – सर विल्यम वेडनबर्न. यांनी १८६० त १८८७ या काळात सरकारी नोकरशाहीत अनेक महत्त्वाची पदे भूषविली होती. त्या वेळच्या मुंबई इलाख्यात जिल्हा न्यायाधीश म्हणून ते रुजू झाले. पुढे त्यांनी राजकीय खात्याचे सचिव, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, मुंबई सरकारचे प्रभारी मुख्य सचिव अशा विविध अधिकारपदांवर काम केले. एक थोर समाजसेवक.

३) नव्या ब्यांकी – शेतकऱ्यांना सावकारांच्या कचाट्यातून सोडवण्यासाठी त्या वेळच्या सरकारी बँका सुरू केल्या होत्या. त्यांचा उल्लेख येथे जोतीरावांनी केला आहे.

४) लोकल फंड – १८६३ सालापासून इंग्रज सरकारने हा कर जनतेवर लादला होता. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी तसेच अंतर्गत दळणवळणाची साधने उपलब्ध करून देण्यासाठी या करातून उभ्या राहणाऱ्या निधीचा उपयोग केला जाणार होता. प्रत्यक्षात या निधीचा उपयोग भलत्याच कामासाठी केला जात आहे.

## स्वाध्याय

१ **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

***१) कानउघाडणी करणे – कडक शब्दांत उपदेश करणे.**

उत्तर: **वाक्य** – श्रेया अभ्यास न करता चित्र काढत बसते म्हणून बाबांनी तिची चांगलीच कानउघाडणी केली.

***२) थारी लागणे – स्थिर होणे, आधार सापडणे, जम बसणे.**

उत्तर: **वाक्य** – वेगवेगळे व्यवसाय करुनसुद्‌धा एकाही व्यवसायात सुरेशचे चित्त थारी लागत नाही.

***३) खापर फोडणे – दोष देणे, दुसऱ्यावर दोषारोपण करणे.**

उत्तर: **वाक्य** – स्वत:च्या निष्काळजीपणाने विलासचा मोबाईल हरवला तेव्हा विलास इतर मुलांवर खापर फोडत होता.

***४) उरावर कट्यार टांगलेली असणे – भविष्याविषयी चिंता वाटणे.**

उत्तर: **वाक्य** – प्रदुषणाच्या वाढत्या समस्येमुळे जगातील सर्वच देशाच्या उरावर कट्यार टांगलेली आहे.

**५) ददात नसणे – उणीव नसणे.**

उत्तर: **वाक्य** – आईच्या प्रेमामध्ये, मायेमध्ये कधीच कुठल्याही प्रकारची ददात नसते.

**६) नादी लागणे – एखाद्या गोष्टीकडे जास्त ओढा निर्माण होणे.**

उत्तर: **वाक्य** – जुने प्रशस्त वाडे विकून माणसे नवीन इमारती बांधण्याच्या नादी लागले आहेत.

**७) छातीस हात लावून सांगणे – निश्चयपूर्वक सांगणे.**

उत्तर: **वाक्य** – दहावीच्या परिक्षेत चांगल्या मार्कांने पास होणारच हे स्वप्नील छातीस हात लावून सांगत होता.

**प्र. २ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ७० ते ८० शब्दांत लिहा.**

***१) सरकारी कामगारांच्या परिस्थितीचे वर्णन महात्मा फुले यांनी कोणत्या शब्दांत केले आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' या पाठ 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातून घेतलेला असून, या पाठात जोतीराव गोविंदराव फुले उर्फ महात्मा फुले यांनी सरकारी कामगार किती ऐशारामात राहतात याचे वर्णन केले आहे.



इंग्रजांच्या राजवटीत वेगवेगळ्या हुद्‌दयावर कामगार काम करीत असत. लष्करी, न्याय, जंगल, पोलिस, विद्या इत्यादी खात्यातील बऱ्याच कामगारांना महिन्याला शंभर रूपये पगार मिळे. त्यांचा किरकोळ खर्च व मद्यपानाचा खर्च यांसाठी १५ रुपयेसुद्‌धा या युरोपियन वा नेटिव्ह सरकारी कामगारांना पुरत नसत. त्यांचया खाण्यासाठी उत्तम गहू, तांदूळ, डाळ, निकोपी गाया, शेळ्या व मेंढ्यांचे मांस, अंमली दारु, निर्मळ तेल, तूप, दूध, साखर, चहा, मीठ, मिरच्या, गरम मसाला इत्यादी वस्तू घेऊन ख्रिस्ती आचाऱ्याकडून दिवसातून तिन वेळा स्वयंपाक केला जाई. हे अन्न त्यांना वेळच्या वेळी आयते दिले जात असायचे.

इंग्रजांनी या सरकारी कामगारांना राहण्यासाठी लाखो रुपये खर्चून दोन मजली बराकी बांधल्या होत्या. त्या घरामध्ये खाट,त्यावर बिछाना, उशी, पलंगाबरोबरच उबदार पांघरुण (धाबळी), रोषणाईसाठी झुंबर इत्यादी सर्व सोयी तेथे होत्या. पायात पाटलोन, पैरणीवर लाल बनाती डगले, कालाबूतचा कशीदा काढलेली टोपी, पायात पायमोजे, त्यावर विलायती बांधणीचे मऊ चामड्याचे बूट, कमरेला तोस्तान, खांद्याला चापाची बंदूक, उंच कपडे, बनाती रुमाल असा डौलदार पोषाख त्यांचा असे. एकंदरीत हे इंग्रज सरकार सरकारी कामगारांवर उधळपट्टी करीत असे.

***२) महात्मा फुले यांच्या काळातील शेतकऱ्यांच्या जगण्याचे वर्णन करा.**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' या पाठ 'शेतकऱ्याचा आसूड'या ग्रंथातून घेतलेला असून, या पाठात जोतीराव गोविंदराव फुले उर्फ महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे जीवन कसे हालाखीचे आहे याचे विदारक चित्र रंगविले आहे.



आपल्या देशातील शेतकरी हा विलायती कर्जाच्या ओझ्याखाली दडपला गेला आहे. त्याला पोटभर अन्न व अंगभर वस्त्र कधीही मिळत नाही. शेतकरी आपल्या बायकामुलांसह शेतात कष्ट करतात. पण त्यांना एकामाणसाला महिन्याला तीन रुपयेही मिळत नाही. गरीब बिचारा शेतकरी कमरेला लंगोटी, डोईवर चिंध्यांचे पागोटे, उघडाबंब, अनवाणी अशा थितीत दिवसभर, भर उन्हात धसकटांनी भरलेली ढेकळे तुडवीत जमिन नांगरतो.

शेतकऱ्याचा पोषाख म्हणजे जाड्याभरड्या खादीचा दुहेरी मांडचोळणा, बंडी, पासोडी, लाल रंगाचे पागोटे, दोरीने बांधलेला गावठी जोडा, जोंधळ्याची, नाचणीची किंवा कोंड्याची भाकरी, गाजर–रताळ्याची कणी, कालवण, आमटी, बोंबलाचे खळगुट, चटणीचा गोळा हे त्याचे अन्न. चटणीभाकरीही वेळच्या वेळी मिळत नाही.





या गरीब शेतकऱ्याचे घर गोठ्याशेजारीच असते. त्यामुळे गुरांच्या शेणामुताची घरात सतत दुर्गंधी असते. अंथरुण–पांधरुण म्हणून शेतकऱ्याल फाटके पटकूर व मळकट गोधडी एवढेच मिळू शकते. अशा प्रकारे महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या जगण्याचे वर्णन केले आहे.

**३) युरोपीय पलटणीतील गोऱ्या सोजिरांच्या जीवनाचे चित्र महात्मा फुले यांनी कसे केले आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' या पाठ 'शेतकऱ्याचा आसूड'या ग्रंथातून घेतलेला असून, या पाठात जोतीराव गोविंदराव फुले उर्फ महात्मा फुले यांनी सरकारी कामगार किती ऐशारामात राहतात, या गोऱ्या सोजिरांच्या जीवनाचे वर्णन केले आहे.



गोऱ्या शिपायाच्या पोषाखात पायांत, पाटलोन, अंगात पैरणीवर लाल बनाती डगले, डोईवर कलाबूतचा कशिदा काढलेली नखरेदार टोपी, पायामध्ये सूती पायमोजे, त्यावर विलायती वजविलेल्या मजबूत मऊ कातड्याचा बुट, कंबरेवर कातड्यांचे तोस्तान व खांदयावर चापाची बंदूक घेऊन दररोज सकाळी आणि सायंकाळी हवाशीर मैदानांत अर्धा तास किंवा एकतास परेडीची कसरत करीत असे.

सरकार त्यांच्या खाण्यापिण्याकडेही लक्ष देत असत. उत्तम गहू, तांदूळ, डाळ, निर्मळ तेल, तूप, दूध, साखर, चहा, मीठ, मिरच्या, गरम मसाला अशा गोष्टींची व्यवस्थाही सरकारने केली होती. या पदार्थांपासून बनवलेले उत्तम जेवण त्यांना दिवसातून तीन वेळा मिळत असे. यासाठी तेथे आचारी ठेवलेला असे.

गोऱ्या सोजिरांच्या वास्तव्यासाठी मुद्दाम दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या होत्या. तेथे त्यांना लोखंडी खाट, बिछाना, उशी, पलंगपोस उबदार पांघरुण ही सर्व व्यवस्था केलेली असे. दिवे, शौचकूप, फिल्टर केलेले पाणी, याबरोबर त्याला वैद्यकीय सेवाही उत्तम मिळत असे. त्यांना कोणतेही कर किंवा लोकलफंड द्यावे लागत नसत. शिवाय दर महिन्याला ठरावीक वेतन मिळे.

**प्र. ३ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.**

***१) शेतकऱ्यांवरील करआकारणीबद्दल महात्मा फुले यांचे काय मत आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' हा पाठ 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातून घेतलेला आहे. महात्मा फुले या आपल्या लेखात सरकारला सांगतात की, सावकाराचे कर्ज व विलायती सरकाराचे व्याज यांमुळे या देशातील शेतकरी गरीबच नव्हे तर अगदी कंगाल झाला आहे.



महात्मा फुले म्हणतात की, सरकारने हे विलायती सरकाराचे व्याज रद्द करावे. सरकार आपल्या खात्यातील सर्व गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षा अधिक रक्कम असलेले पगार देतात, ते त्यांनी कमी करावे. अशा रितीने पैसे वाचलेले असतील तर ते पैसे परदेशातील एखाद्या योजनेवर खर्च करु नये. त्या पैशाने अज्ञानाने गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान करावे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्टया कमी कराव्यात. अशा रितीने पैसे वाचवले तरच हे सर्व शक्य होईल.

***२) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी कोणते उपाय सुचविले आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' हा पाठ 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातून घेतलेला आहे. महात्मा फुले यांनी आपल्या लेखात सरकारला सुनावले आहे की, सरकारला शेतकऱ्यांविषयी खरी काळजी असेल तर त्यांनी कोट्यावधी रुपयांचे व्याज जे विलायती सरकारने लावलेले आहे ते त्यांनी रद्द करावे. सरकार आपल्या इतर खात्यातील लोकांना जास्त वेतन देते ते त्यांनी कमी करावे व तो पैसा शेतकऱ्यांवर खर्च करावा. या पैशातून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल व त्यांनाही शिक्षण घेता येईल. शेतकऱ्यांवर लावलेला शेतसारा, टोल वगैरे पट्टया कमी कराव्यात असे केले तर त्यांची परिस्थिती नक्कीच सुधारेल.

**३) इंग्रजांच्या राज्यात नेटिव्ह कामगारांचे वागणे कसे होते?**

उत्तर: शेतकऱ्यांची परिस्थिती' हा पाठ 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातून घेतलेला आहे. महात्मा फुले यांनी आपल्या लेखात इंग्रज राजवटीतील भारतीयांचा उल्लेख 'नेटिव्ह' असा करतात. नेटिव्ह म्हणजे कुठल्याही देशाचा मूळ रहिवासी.

महात्मा फुले सांगतात की, हे नेटिव्ह कामगार ऐषआरामी जीवन जगणाऱ्या वृत्तीच्या युरोपियन कामगारांच्या पुढे पुढे करतात. मात्र अज्ञानी शेतकऱ्यांकडून लाच घेतात, त्यांना लुबाडतात. अशा लोकांचा महात्मा फुले धि:कार कारतात.

**प्र. ४ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

***१) गोऱ्या सोजीरांसाठी स्नानाची व्यवस्था कशी केली जाई?**

उत्तर: गोऱ्या सोजिरांच्या स्नानासाठी बराकीच्या अंगणात न्हाणी करुन तिच्यात 'फिल्टर' केलेल्या पाण्याची तोटी सोडलेली होती.

***२) सरकारने दोन मजली टोलेजंग इमारती कोणासाठी बांधल्या?**

उत्तर: सरकारने दोन मजली टोलेजंग इमारती गोऱ्या शिपायांसाठी बांधल्या.

***३) शेतकरी आणि गोरे सोजीर यांच्या स्थितीची तुलना महात्मा फुले यांनी कोणत्या अलंकारीक शब्दांत केली आहे?**

उत्तर: शेतकरी आणि गोरे सोजीर यांच्या स्थितीमध्ये 'काशीरामेश्वरापेक्षाही जास्त अंतर आहे', या अलंकारीक शब्दांत महात्मा फुले यांनी केली आहे.

**४) शेतकऱ्यांचे मासिक उत्पन्न किती असे?**

उत्तर: शेतकऱ्यांचे मासिक उत्पन्न दर माणशी दरमहा तीन रुपयांपेक्षाही कमी असे.

**५) 'शेतकऱ्यांची परिस्थिती'हा लेख कोणी लिहीला आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थिती' हा लेख महात्मा फुले म्हणजेच जोतीराव गोविंदराव फुले यांनी लिहीला आहे.

**६) शेतकऱ्यांच्या अज्ञानाचे निराकरण करण्यासाठी महात्मा फुले यांनी सरकारला काय सूचना केली आहे?**

उत्तर: शेतकऱ्यांच्या अज्ञानाचे निराकरण करण्यासाठी महात्मा फुले हे सरकारला सांगतात की, दुबळ्या शेतकऱ्यास विद्यादान करावे व त्याच्या डोक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्टया कमी कराव्यात. ,

**७) 'शेतकऱ्यांची परिस्थिती' हा लेख कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?**

उत्तर: 'शेतकऱ्यांची परिस्थती' हा लेख 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातून घेतला आहे.

**८) कोणत्या गुलाबी लिहीण्यावर बिलकूल भरवसा ठेवू नये, असे महात्मा फुले सांगतात?**

उत्तर: येथील धूर्त लोकांनी उपस्थित केलेल्या समाजाच्या व वर्तमानपत्रांच्या गुलाबी लिहीण्यावर (फसवे लिखाण) भरवसा ठेवू नये असे महात्मा फुले सांगतात.

**९) जोतीराव फुले गव्हरनर जनरल साहेबांना कोणती विनंती करतात?**

उत्तर: जोतीराव फुले गव्हरनर जनरल साहेबांना विनंती करतात की, लहान मोठया सारकारी खात्यातील शंभर रुपयांचे पगारावरील कामगारांचे पगार व पेन्शन कमी करण्याविषयी विलायती सरकारास कळवावे.

**१०) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची तुलना कोणाशी केली आहे?**

उत्तर: महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची तुलना गोऱ्या सोजीऱ्याच्या स्थितीशी केली आहे.

**११) शेतकऱ्यांचे राहते घर कोठे असे?**

उत्तर: शेतकऱ्यांचे राहते घर बैलांच्या गोठ्याशेजारीच असे.

**१२) महात्मा फुले कोणाला सरकारची कानउघाडणी करायला सांगतात?**

उत्तर: महात्मा फुले मे. वेडरबर्नसाहेब यांना सरकाकरची कानउघाडणी करायला सांगतात.

**१३) शेतकऱ्यांच्या जेवणात कोणते पदार्थ असत?**

उत्तर: शेतकऱ्यांच्या जेवणात जोंधळी, नाचणी, कोंड्याभोंड्याची भाकरी, गाजरेरताळांचे वरु, कालवण, आमटी, बोंबलाचे खळगुट हे पदार्थ असत.

**१४) विलायती सावकारांना किती व्याज द्यावे लागे?**

उत्तर: विलायती सावकारांना एक अर्व म्हणजे दहा कोटी रुपये इतके व्याज द्यावे लागे.

**१५) शेतकऱ्यांना रात्री झोपण्यासाठी कोणत्या गोष्टी मिळत असत?**

उत्तर: शेतकऱ्यांना फाटके पटकूर व मळकट गोधडी यांचे अंथरुण-पांघरुण ह्याच गोष्टी रात्री झोपण्यासाठी उपलब्ध होत असत.

**१६) सोजीरांची रात्री झोपण्याची व्यवस्था कशी असे?**

उत्तर: सोजीरांसाठी लोखंडी खाट, त्यावर बिछाना व उशी आणि पलंगपोसासह धाबळी (उबदार पांघरुण) इत्यादी गोष्टींची सोय केलेली असे.

**प्र. ५ खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

***१) मग कलेक्टर वगैरे कामगारांसारख्या नवाबांचे येथील बेलगामी किरकोळ खर्चाविषयी गोष्ट काढल्यास आमचे कोण ऐकतो?**

उत्तर: **संदर्भ** : वरील वाक्य महात्मा फुले यांनी लिहीलेल्या 'शेतकऱ्यांची परिस्थिती ' या पाठातील असून हा पाठ महात्मा फुलेंच्या 'शेतकऱ्याचा आसूड'या पुस्तकातून घेतला आहे. या लेखात महात्मा फुले शेतकऱ्यांच्या गरीब परिस्थितीचे वर्णन करतात. तसेच खर्च कसा अनियंत्रित होता हे सुद्धा सांगतात.

**स्पष्टीकरण** : शेतकऱ्यांना शेतात काबाडकष्ट करावे लागतात. एवढे पराकोटीचे कष्ट करुनसुद्धा शेतकऱ्यांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळत नाही. त्यांच्या घराला जवळजवळ गोठ्याचेच स्वरुप आलेले असते. त्यांना दरमहा दरडोई तीन रुपयेही मिळत नाहीत. सरकारी कामगारांची मात्र चंगळ असते. त्यांना कोणतेच कष्ट करावे लागत नाही, कर भरावे लागत नाही, शिवाय पगारही भरमसाठ असतो. अशा स्थितीत कलेक्टर वगैरेंसारखे अधिकारी नवाबांप्रमाणे राहतात त्यांच्या अनियंत्रित खर्चाविषयी सरकारकडे बोलले तर कोणी ऐकूनही घेत नाहीत असे महात्मा फुले सांगत आहेत.

**वैशिष्ट्य** : शेतकरी व सरकारी कामगार यांच्यातील विसंगती पाहून शेतकऱ्यांसाठी लेखकांचे मन खूप दुःखी होत आहे हे वरील उद्गारातून दिसून येते.

***२) त्यास राहण्याकरितां लाखो रुपये खर्ची घालून सरकारने दोन मजली टोलेजंग बराकी बांधल्या आहेत.**

**उत्तर: संदर्भ** : वरील वाक्य महात्मा फुले यांनी लिहीलेल्या 'शेतकऱ्यांची परिस्थिती ' या पाठातील असून हा पाठ महात्मा फुलेंच्या 'शेतकऱ्याचा आसूड'या पुस्तकातून घेतला आहे. या लेखात महात्मा फुले यांनी विलायती सरकारच्या खात्यात काम करणारे कामगार म्हणजे गोरे सोजिर यांच्या परिस्थितीशी तुलना करतांना वरील माहिती दिली आहे.

**स्पष्टीकरण** : या देशातील शेतकऱ्याची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. तो गरीब आहे, कंगाल आहे. दिवसभर शेतात तो काबाडकष्ट करतो तरी त्याला दर महिन्याला दरडोई तीन रुपयेसुद्‌धा मिळत नाही. सरकारचे सर्व कर त्याला भरावे लागतात. गोठ्याला लागूनच असलेल्या घरात त्याला रहावे लागते. याऊलट सोजिरांना सर्व ऐशआरामाच्या सोयी असतात. त्यांना कष्ट करावे लागत नाही. पगारही भरमसाठ मिळतो, कोणतेही कर भरावे लागत नाही. तरीही सरकार त्यांच्यासाठी लाखो रुपये खर्च करुन उंच इमारती बांधते, हे महात्मा फुले यांना खटकते.

**वैशिष्ट्य** : सरकारच्या धोरणातील कामगार व शेतकरी यांच्यातील तीव्र विसंगती महात्मा फुलेंनी दाखवून दिली आहे.

**३) थोड्याच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे, असे आमच्या ऐषआरामी उधळ्या सरकारचे कानांत सांगून याप्रसंगी पुरें करितों.**

**उत्तर: संदर्भ** : वरील वाक्य महात्मा फुले यांनी लिहीलेल्या 'शेतकऱ्यांची परिस्थिती ' या पाठातील असून हा पाठ महात्मा फुलेंच्या 'शेतकऱ्याचा आसूड'या पुस्तकातून घेतला आहे. या लेखाचा समारोप महात्मा फुले यांनी वरील वाक्यातून केला आहे.

**स्पष्टीकरण** : इंग्रज सरकारच्या राज्यात इंग्रजी सैनिक, नेटिव्ह कामगार मजेत आहेत. पण शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र दयनीय आहे. हा शेतकरी कंगाल आहे. अशा शेतकऱ्यांवर सरकारकडून शेतसारा, लोकल फंड असे. कर बसवले जातात. घरात खायला अन्नही नसणाऱ्या शेतकऱ्यांना हा कर भरणे शक्य नसते. म्हणून महात्मा फुले अशा सरकारचा उल्लेख ऐषआरामी, उधळे असा करतात.

वर्षानुवर्षे शेतकऱ्यांवर हा जुलूम होत आहे. पण त्यातून काही पर्याय काढला नाही तर याचे परिणाम वाईट होतील अशा शब्दांत महात्मा फुले सरकारची कानउघाडणी करतात व आपले शब्द पूर्ण करतात.

**वैशिष्ट्य** : शेतकऱ्यांवर जो जुलूम होत आहे तो थांबवला नाही तर वाईट परिणामांना सामोरे जावे लागेल हे महात्मा फुले गंभिरपणे सांगतात.



**प्र. ६ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) अशा नव्या ब्यांकी उपस्थित करण्याचे नादी लागून शेतकऱ्याचे माथ्यावर ----- खापर फोडू नये.

२) तर ते आपले विलायती सावकारांचे ----- रकमेचे व्याज अजीबाद बंद कां करीत नाहीत?

३) मग कलेक्टर वगैरे कामगारांसारख्या नवाबांचे तेथील ----- किरकोळ खर्चाविषयी गोष्ट काढल्यास आमचे कोण ऐकतो?

४) येथील एक आठ बैली ----- ओढणारा शुद्र शेतकरी असून त्याचे चार-पाच कर्ते मुलगे आहेत.

५) अशाची स्थिती येथील एका युरोपीयन पलटणींतील साधारण गोऱ्या सोजराच्या स्थितीशी सूक्ष्म रीतीने तुलना करुन पाहिली असता त्यामध्ये ----- जास्ती अंतर दिसून येते.

६) शिंपलेवजा नोकरदार ----- युक्त अशा खरबरीत ढेकळांतून आठ बैलांशी झटे घेतां घेतां गीत गाऊन नांगर हाकीत आहे.

७) ----- का होईना, परंतू ती तरी वेळच्या वेळी व पोटभर त्यास मिळते काय?

८) याशिवाय सरकारी शेतसारा वगैरे फंड व पट्टया कोठून व कशा द्याव्यात, यासंबंधी त्यांच्या उरावर ----- टांगलेली असे.

९) काय हा ----- ! याला म्हणावे तरी काय !

१०) त्यास राहण्याकरितां लाखो रुपये खर्ची घालून सरकारने दोन मजली टोलेजंग ----- इमारती बांधल्या आहेत.

११) हा पहा ----- कामगार, ऐषआरामी युरोपियन कामगारांचे पुढे पुढे करुन अज्ञानी शेतकऱ्यांपासून लांच खाऊन कसा सोजरासारखा लाल गाजर पडला आहे.

१२) बराकीचे आंगणात स्नानाकरिता न्हाणी करुन तिजमध्ये ''फिल्टर'' केलेले पाण्याची ----- सोडली आहे.

उत्तरे :
१) अपेशाचे २) एक अर्व
३) बेलगामी ४) कुणबावा
५) काशीरामेश्वरापेक्षाही ६) धसकटांनी
७) चटणी भाकर ८) कटार
९) उघळेपणा १०) बराकी
११) नेटिव्ह १२) तोटी

*****

ज्ञानसागर अहमदनगर

नोट्स